CIDCO
WE MAKE CITIES

प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

सिडको

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: mohan.ninawe@gmail.com

**दि. ०२.०६.२०१८**

**नेरूळ येथे मोक्याच्या ठिकाणी १.३ हेक्टरचा भूखंड विकासकांना नवीन संधी**

सिडको महामंडळातर्फे नेरूळ येथील सेक्टर- १९ ए मध्ये निवासीसह वाणिज्यि क वापरासाठी असलेल्या १३,६१९.४७ चौ.मी. च्या भूखंडासाठी निविदा मागविण्यात आल्या असून विकासकांना आणखीन एक संधी उपलब्ध झाली आहे . नेरूळ हा नवी मुंबईतील सर्वाधिक विकसित नोड्सपैकी एक नोड आहे . महत्त्वाच्या पायाभूत सुविधांच्या दृष्टीने समृद्ध असलेला नेरूळ नोड हा वाशी आणि बेलापूर या विकसित नोड्सशी स्पर्धा करीत आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिडांगण आणि सुप्रसिद्ध शैक्षणिक केंद्र असलेला नोड अशीही नेरूळची ख्याती आहे.

सदर भूखंड हा सुप्रसिद्ध अपोलो रुग्णालया जवळ आणि आम्र मार्गालगत , अशा मोक्याच्या ठिकाणी स्थित आहे. सदर भूखंडाचे ठिकाण हे शीव -पनवेल महामार्ग आणि पाम बीच मार्ग यांच्याशी व्यवस्थितरित्या जोडले गेले आहे. अर्जासह योजना पुस्तिकेची विक्री दि . ३१ मे २०१८ पासून सुरू झाली असून या भूखंडासाठी रु . ९५,४६१ इतका आधारभूत दर निश्चित केला आहे.

या भूखंडाची विक्री निविदा पद्धतीने केली जाणार आहे. या भूखंडाचे मोक्याचे स्थान लक्षात घेता आतापर्यंतचा सर्वाधिक दराचा उच्चांक मोडेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या योजनेच्या पुस्तिका निर्मल, नरिमन पॉइंट (मुंबई) आणि पणन व्यवस्थापक , ३ रा मजला, रायगड भवन (बेलापूर) या सिडको कार्यालयांत उपलब्ध असून इच्छुकांना २० जूनपर्यंत अर्ज सादर करण्याची संधी आहे.

---

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी, सिडको**